# दावीद राजाने वाईट सवय सोडून दिली

## देव मुलांच्या जीवनातील पापाची सत्ता कशी मोडून काढतो ते त्यांना शिकवा.

**प्रार्थनाः** ''प्रिय प्रभू, दावीद व बथशेबा ह्यांच्या संबंधीच्या ह्या अभ्यासाचा उपयोग मुलांना त्यांच्या वाईट सवयी सोडून देण्यासाठी करून घे.''

देवाने दावीदच्या जीवनातील व्यभिचाराच्या पापाचे सामर्थ्य कसे मोडून काढले ते सांगण्यासाठी **2 शमुवेल अध्याय 11 व 12:1-23** वाचून तयारी करा.

मोठ्या मुलांनी कथावृत्तांत वाचून दाखवावा किंवा सांगावा. मग **2 शमुवेल 11:1-17** मधून पुढील प्रश्न विचारा (प्रत्येक प्रश्नापुढे उत्तरे दिली आहेत).



- राजाने त्याची नसलेली कोणती गोष्ट घेतली? *(उत्तरः पाहा वचन 4. दावीदाला त्याला हवी असलेली कोणतीही गोष्ट घेण्याची सवय लागली होती, कारण तो राजा होता. अशी सवय असणे हे पाप आहे. याचाच परिणाम म्हणून व्यभिचाराचे पातक त्याच्या हातून घडले.)*
- दावीद राजाने उरीयाला कसे फसवले? *(पाहा वचन 8)*
- एका पापाने दावीदाला इतर पातके करण्यास कसे भाग पाडले? *(पाहा वचन 13 व 14. अनेकदा, आपण एक पाप झाकण्याच्या प्रयत्नात अधिक घोर पातके करतो. दावीदाने त्याचे पाप झाकण्याच्या प्रयत्नात खोटे बोलण्याचे व खून करण्याचे पाप केले.)*

2 शमुवेल 12:1-14 वरील **प्रश्न.**

- दावीदाला त्याने स्वतः केलेले पाप समजावे यासाठी नाथान संदेष्ट्याने त्याला काय सांगितले? *(पाहा वचन 1.त्याने एक कथावृत्तांत सांगितला. आम्हांला आमचे पाप समजावे, आमच्यासाठी प्रार्थना करावी आणि आमच्या कृत्यांची जबाबदारी स्वीकारण्यास आम्हांला मदत करण्यासाठी देव बरेचदा सूज्ञ लोकांचा उपयोग करून घेतो).*
- देवाने दावीदाच्या जीवनातील पापाचे सामर्थ्य मोडून काढले, त्यापूर्वी दावीदाला काय करावे लागले? *(वचन 13)*
- देवाने दावीदाला क्षमा केली का? *(वचन 13)*
- दावीदाच्या पापाचा परिणाम काय झाला? *(वचन 14)*

दावीद व बथशेबाच्या कथा वृत्तांताचे नाट्यीकरण करा.

- मुलांना ही नाटिका सादर करता यावी यासाठी - उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून व्यवस्था करा.
- मोठ्या मुलांनी लहान मुलांकडून तयारी करून घेण्यास मदत करावी.
- मोठ्या मुलांनी किंवा प्रौढांनी नाथान, दावीद, बथशेबा, उरीया व निवेदक ह्या भूमिका कराव्यात. निवेदक कथावृत्तांताचा सारांश तयार करतील आणि मुलांना त्यांचे संवाद पाठ करण्यास मदत करतील.
- लहान मुलांनी तिरंदाज, श्रीमंत मनुष्य, गरीब मनुष्य, पाळलेली मेंढी आणि मेंढरे ह्या भूमिका कराव्यात.
- शक्य तो कमीत कमी शब्दात ही नाटिका सादर करण्याचा प्रयत्न करा.
- तुमचा गट अगदीच लहान असेल तर शेरडे-मेंढरे वगळा (श्रीमंत मनुष्य ती मोजण्याचा अभिनय करील).

**निवेदक:** 2 शमुवेल 11:1-17 मधून कथावृत्तांताचा पहिला भाग सांगून म्हणा, ''दावीद स्वत:शी काय बोलतो ते ऐका.''

**दावीद:** छाती पुढे काढून ऐटीत फेऱ्या मारीत गर्वाने म्हणा, ''मी राजा आहे. मला हवे ते मी  करीन. मला हवे ते मी मिळवीन.''

**बथशेबा:** दावीदाच्या समोर चाला मग हात धुतल्याचा अभिनय करा.

**उरीया:** तुमची पत्नी बथशेबा हिच्याजवळ उभे राहा; परंतु, तिच्याकडे वा दावीदाकडे न पाहता दुसरीकडेच पाहा.

**दावीद:** बथशेबाकडे पाहा आणि मग कोणी पाहात नाही याची खात्री करून घेण्यासाठी इकडे तिकडे बघा. मग तिला हाताने खूण करून बोलवा.

**बथशेबा:** दावीदाकडे जा आणि त्याच्याबरोबर चाला.

**तिरंदाज:** उरीयाजवळ जाऊन त्याला बाण मारण्याचा अभिनय करा. वांग' असा धनुष्याचा आवाज तोंडाने करा.

**उरीया :** छातीवर हात ठेवून वेदनेने जोरात ओरडा आणि मृतवत् असे खाली पडा.

**निवेदक:** 2 शमुवेल 12:1-14 मधून कथा वृत्तांताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''नाथान संदेष्टा दावीद राजाला काय सांगतो ते एका.''

**नाथान:** ''दावीद राजा ऐक, मी तुला एक गोष्ट सांगणार आहे.''

**पाळलेले मेंढी:** हात पाय वाकवून रांगत गरीब मनुष्याकडे मेंढीसारखा आवाज करत जा.

**गरीब मनुष्य:** छान गोजीरवाणे मेंढरू आहे! ''मेंढीला थोपटा.

**शेरडे मेंढरे:** मेंढीसारखे रांगत श्रीमंत मनुष्याकडे जाऊन त्याच्या अवती भवती गर्दी करा.

**श्रीमंत मनुष्य:** मोठ्याने शेरडे मेंढरे मोजा. मग म्हणा, ''मला खाण्यासाठी मेंढरू हवे आहे! ''गरीब मनुष्याच्या पाळलेल्या मेंढीकडे बोट दाखवून म्हणा,'' ती चांगली आहे! जा ती घेऊन या त्या मेंढीच्या गळ्यावर सुरी फिरविल्याचा अभिनय करा. ती खाली पडते.

**नाथान:** ''राजा तू हे काय केलेस जे तुझे नाही ते तू घेतलेस. तूही मृत्यू दंडाच्या शिक्षेस पात्र आहेस!''

**दावीद राजा:** माझे चुकले मी कबूल करतो देवा मला क्षमा करो! माझ्या जीवनात हे पाप मोठे मोठेच होत होते, पहा आता देवाने तुमच्याद्वारे त्याचे सामर्थ्य मोडून काढावे. आता येथून पुढे मी चांगले वागीन.''

**नाथान:** देवाने तुला क्षमा केली; पण, तुझ्या पापाचे परिणाम मात्र वाईटच होणार. बथशेबाचे मूल जिवंत राहणार नाही.

**प्रश्न.** मुलांनी ह्या कथावृत्तांताचे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांनी प्रौढांना विचारावेत.

**पुढे** दिलेल्या फुलांच्या चित्रांमधून काटेरी झुडुपाचे चित्र काढा



मुलांनी हे चित्र मोठ्या माणसांना उपासनेच्या वेळी दाखवावे.

ह्या चित्रावरून, पाप हे बागेतल्या तणाप्रमाणे असते ते पसरते आणि हे तण आम्ही वेळीच उपटून टाकले नाही तर त्यातून इतर पापांचा जन्म होतो. देव आम्हांला पापाच्या सामर्थ्यातून सोडवितो. आम्हांला आमच्या पातकांचा पश्चात्ताप होतो आणि आम्ही त्याच्याकडे क्षमा मागतो, तेव्हा तो आम्हांला पापाच्या सत्तेतून मुक्त करतो, हे सर्व स्पष्ट होते.

**चर्चा.** देवाने लोकांच्या जीवनांताल वाईट सवयींचा प्रभाव कशाप्रकारे मोडून काढला याची मुलांनी व प्रौढांनी इतर उदाहरणे सांगावीत.

**कविता.** स्तोत्र 51:14-17 ह्या शास्त्रभागातून चार मुलांनी एकेक वचन महणावे.

स्तोत्र 51 मधील शब्द अथवा कल्पना घेऊन मोठ्या मुलांनी कविता वा गीत लिहावे.

**पाठ करा स्तोत्र 51:12**

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, कधी कधी आमच्या जीवनांतील पातके अधिक आणि अधिक मोठी होत जातात. त्यांची सत्ता आम्हांला मोडून काढता येत नाही. त्या पापांबद्दल आम्ही पश्चात्ताप करावा आणि त्यापासून दूर राहण्यासाठी आम्हांला सूज्ञ लेकांची मदत मिळावी याकरिता आमचे साहाय्य कर. येशूच्या नावात शुध्द-स्वच्छ जीवन जगता यावे याकरिता आम्हांला तुझे सामर्थ्य दे.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net